# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ३ रे अंक ११६ वा शुक्रवार दि.२२ सप्टेंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## जनतेच्या भावनांचा घेतला जातीय गैरफायदा

रायपूर : काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांनी छत्तीसगड मध्ये आयोजित एका कार्यक्रमात बोलताना पंतप्रधान मोदी आणि भाजपवर निशाणा साधला आहे. त्यांनी गुरुवारी महिला समृद्धी परिषदेला संबोधित केले. यावेळी त्या म्हणाल्या की, राजकारणात धर्म आणि जातीबद्दल बोलणे हा मोठ्या राजकीय षडयंत्राचा भाग आहे. पूर्वीच्या राजकारणात आणि आताच्या राजकारणात खूप बादल झाला आहे. पण जनता तेव्हाही जागरूक होती आणि आजही आहे. मात्र, आता जनतेच्या भावनांचा गैरफायदा घेतला जात आहे. त्या म्हणाल्या की, धर्म आणि जातीच्या



चर्चा होतात. त्याचा राजकीय वापर केला जात आहे. जनतेचे लक्ष आणि भावना धर्माकडे वळवण्यासाठी हे सर्व केले जात आहे. या ध्रुवीकरनंतर, जनता त्यांना जाब विचारणार नाही, असे त्यांना वाटते. यामुळे रोजगार, रस्ता, पाणी आणि अन्य महत्वपूर्ण मुद्दे मागेच राहतात. प्रियंका गांधी म्हणाल्या की, जेव्हा धर्म आणि जातीचा प्रश्न येतो, तेव्हा माझ्या पतीला मला रोजगार का मिळाला नाही, हे तुम्ही त्यांना विचारा. हे एक मोठे राजकीय षडयंत्र आहे. जनतेचे लक्ष विचलित करण्यात येत आहे. ही खेदाची गोष्ट आहे आणि आजच्या राजकारण हेच चालले आहे.

## मतदार यादीमध्ये नाव नोंदणीसाठी आधार कार्डची गरज नाही

नवी दिल्ली : मतदार यादीमध्ये नाव नोंदणीसाठी भरण्यात येणा-या फॉर्ममध्ये आता बदल करण्यात येणार आहे. मतदार यादीमध्ये नाव नोंदणी करण्यासाठी आधार कार्ड किंवा आधार नंबरची गरज नसल्याचे स्पष्ट झाले होते. त्यानुसार फॉर्म ६ आणि फॉर्म ६बी यामध्ये आवश्यक ते बदल केले जा-तील.निवडणूक आयोगाने याबाबत सर्वोच्च न्यायालयामध्ये



हमीपत्र दिले आहे. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड, न्यायमूर्ती जे. बी. परडीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या खंडपीठाला हे हमीपत्र देण्यात आले. यासोबतच, रजिस्ट्रेशन ऑफ इलेक्टर्स नियम २६-बी या नियमांमध्ये २०२२ साली झालेल्या दुरूस्तीनुसार आता मतदार यादीमध्ये नावनोंदणी करण्यासाठी आधार क्रमांक अनिवार्य नसेल, असेही आयोगाने स्पष्ट केले.

तेलंगणा प्रदेश कमिटीचे वरिष्ठ उपसंचालक जी. निरंजन यांनी सर्वोच्च न्यायालयात एक याचिका दाखल केली होती. फॉर्म ६ आणि फॉर्म ६ बी या दोन्ही फॉर्ममध्ये आधार क्रमांकाची माहिती मागितली जात असल्याचं या याचिकेत म्हटले होते. यावर सुनावणी सुरू असताना वरिष्ठ वकील सुकुमार पट्टजोशी आणि अमित शर्मा यांनी निवडणूक आयोगाची बाजू मांडली. आतापर्यंत मतदार याद्या निश्चित करण्याच्या प्रक्रियेतून ६६,२३,००,००० आधार नंबर अपलोड करण्यात आले आहेत.

## सोयाबीन संशोधन केंद्रासाठी लातूर आडत बाजार कडकडीत बंद

लातूर : सोयाबीन संशोधन केंद्र लातूर येथे स्थापन करावे यासाठी शिवसेना सहसंपर्कप्रमुख तथा महाराष्ट्र राज्य बाजार समिती संघाचे उपसभापती संतोष भाऊ सोमवंशी यांच्या नेतृत्वाखाली लातूर बाजार समितीमधील सर्व व्यवहार कडकडीत बंद ठेवून निषेध व्यक्त करण्यात आला. लातूर जिल्हा गेले दोन दशकापासून सोयाबीन हब म्हणून ओळखला जातो . लातूर येथे श्री उध्दवजी ठाकरे मुख्यमंत्री असताना सोयाबीन परिषद संपन्न झाली होती, त्यात तत्कालीन कृषी मंत्री दादाजी भुसे यांनी सोयाबीन संशोधन केंद्र लातूर येथे करण्याचे जाहीर केले होते. परंतु १६ सप्टेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथील राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत परळी येथे सोयाबीन संशोधन केंद्र स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. याच्या निषेधार्थ व लातूर येथे केंद्र स्थापन करण्यासाठी पुनर्विचार करावा या मागणीसाठी आज लातूर बाजार समितीचे सर्व व्यवहार बंद ठेवून विरोध नोंदवला . या आंदोलनास महाराष्ट्रा राज्य बाजार समिती उपसभापती तथा सहसंपर्कप्रमुख संतोष सोमवंशी, माजी जिल्हाप्रमुख नामदेव चाळक, महानगर प्रमुख विष्णुपंत साठे, युवासेना जिल्हाप्रमुख दिनेश जावळे, शहर प्रमुख रमेश माळी,संचालक बालाप्रसाद बिदादा , , सुधीर गोजमगुंडे, शिवाजी कांबळे , आडत व्यापारी अध्यक्ष चंद्रकांत पाटील, गुमास्ता अध्यक्ष तुळशीराम गंभीरे , त्र्यंबक स्वामी , रमेश पाटील, शंकर रांजनकर, बसवराज मंगरूळे,शिवकुमार तोंडारे , श्रीराम कुलकर्णी, अनंत जगताप, विलास लंगर ,अजित सोमवंशी, राहुल रोडे, भास्कर माने, तानाजी करपुरे, सिद्धेश्वर जाधव , सुधाकर कुलकर्णी, राजेंद्र कतारे, बालाजी जाधव, अंजीरराव धानुरे , अमर पवार व आडत, व्यापारी, गुमास्ता, हमाल, व गाडीवान, शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## स्वत:शी प्रामाणिक राहणे महत्त्वाचे - पोलीस अधिक्षक श्री. सोमय मुंडे

लातूर/प्रतिनिधी

ज्ञानप्रकाश लर्निंग होममध्ये १० वी गणेश मंडळाच्या वतीने जिल्हा पोलीस अधिक्षक श्री.सोमय मुंडे व विश्व विक्रमी नृत्यांगना सृष्टी जगताप यांना निमंत्रित करण्यात आले हो-ते. कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थनेने झाली. गणेश मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या पालकांसाठीच्या चित्रकला स्पर्धेचे बक्षीस वितरण यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रकल्प प्रमुख सतीश नरहरे यांनी केले. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना पोलीस अधिक्षक सोमय मुंडे म्हणाले, जो माणूस स्वतःशी प्रामाणिक राहतो, तोच इतरांसोबत प्रामाणिक राहू शकतो. म्हणून विद्यार्थ्यांनी स्वतःशी प्रामाणिक राहणे महत्त्वाचे आहे. मराठी माध्यमात शिकणार्या मुलांची आकलन क्षमता अधिक विकसित होत असते. माझं स्वतः चं शिक्षण मराठी माध्यमाच्या शाळेत झाल्यामुळे मी मराठी शाळेत शिकणार्या मुलांच्या पालकांना आश्वस्त करू इच्छितो की मातृभाषेतील शिक्षणामुळे तुमच्या मुलांचे भविष्य सुरक्षित आहे. ज्ञानप्रकाश शैक्षणिक प्रकल्पातील मुलांकडून मिळालेला उत्साह आणि ऊर्जा ही जिल्ह्यातील गणेश उत्सव व्यवस्थापन करताना माझ्या कामी येणार आहे.




याप्रसंगी निमंत्रित असलेल्या कु.सृष्टी जगताप यांनी सातत्यपूर्ण प्रयत्न हे आपल्या जीवनातील यशासाठी फार महत्वाचे आहेत. परीक्षा आल्यानंतरच अभ्यास असं न करता 'थेंबे थेंबे तळे साचे' या म्हणीप्रमाणे आपली वाटचाल असली पाहिजे. परीक्षेतील यश अंतिम समजले जाण्याच्या काळात पालकांनी माझ्यावर जो विश्वास दाखविला त्यामुळे मी परीक्षा आणि कला या दोन्ही ठिकाणी यश मिळवू शकले. म्हणून पालकांनी मुलांची आवड लक्षात घेऊन त्यांच्यावर विश्वास दाखवायला पाहिजे, असे मला वाटते.

कार्यक्रमाचे निवेदन ऋतुजा देशमाने आणि पुष्कर पाटील या १० वीच्या विद्यार्थ्यांनी केले. यावेळी प्रकल्पाच्या संचालिका व मुख्याध्यापिका सविता नरहरे, पर्यवेक्षक अशोक गुरदाळे, विभाग प्रमुख प्रशांत शिंदे, शिक्षक, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मराठवाड्याच्या मातीची तहान भागविण्यासाठी साथ द्या - आ.संभाजीराव पाटील निलंगेकर

### वरूणराजाचा आशीर्वाद...

पाऊस नसल्यामुळे लातूर जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती आहे. ही दुष्काळी परिस्थिती कायमची हटवण्यासाठी हे जलसाक्षरता अभियान सुरू करण्यात आले आहे. गुरुवारी शिरूर अनंतपाळ परिसरात दुचाकी रॅली पोहोचली असता प्रत्यक्ष वरूणराजाने अमृतधारांचा वर्षाव करत अभियानास आशीर्वाद दिला.पाऊस असाच कोसळावा.वरूण राजाने कृपा करावी आणि शेतकरी व जनतेवरील संकट दूर करावे,अशी प्रार्थना आ.निलंगेकर यांनी यावेळी केली.

### घरातल्या कक्ष्मीसाठी शिवारात पाणी आवश्यक ...

आज महालक्ष्मीचा सण आहे.प्रत्येक घरात महिला महालक्ष्मीची पुजा करत आहेत.लक्ष्मीची आपल्यावर अखंड कृपा रहावी,ही सर्वांचीच इच्छा असते.पण घरातल्या लक्ष्मीसाठीही शिवारात पाणी आवश्यक आहे. शिवारात पाणी असेल तर धनलक्ष्मी आपल्यावर प्रसन्न राहील. त्यासाठी आपण प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे आ. निलंगेकर म्हणाले.

निलंगा/प्रतिनिधी: वर्षानुवर्ष होणाऱ्या अपुऱ्या पावसामुळे मराठवाड्यात कायमच पाणीटंचाई असते.कायम दुष्काळी भाग असा शिक्का बसलेल्या मराठवाड्याची कोरड दूर करण्याची संधी सरकारच्या निर्णयामुळे आपल्याला मिळाली आहे. मराठवाड्याची तहान भागवण्यासाठी जलसाक्षरता अभियानाला साथ द्या,असे आवाहन आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी केले. लातूर जिल्ह्यासह मराठवाड्यातील दुष्काळ दूर करण्यासाठी आ. निलंगेकर यांच्या नेतृत्वात लातूर जिल्ह्यात जलसाक्षरता अभियान राबविले जात आहे.या अभियानाच्या तिसऱ्या दिवशी तालुक्यातील शिरुर अनंतपाळ,
येरोळ,जवळगा,वलांडी,
देवणी,मोघा आदी गावात दुचाकी रॅली पोहोचल्यानंतर उपस्थितांशी संवाद साधताना आ.निलंगेकर बोलत होते.शिरूर अनंतपाळ येथे ज्येष्ठ नेते ड.संभाजीराव पाटील, जिल्हा बँकेचे संचालक भगवानराव पाटील तळेगांवकर,तालुकाध्यक्ष मंगेश पाटील,काशिनाथ गरीबे,ऋषिकेश बद्दे, प्रशांत पाटील,गोविंद चिलकुरे,रामलिंग शेरे आदींची यावेळी उपस्थिती होती.दरम्यान माजी आमदार सुधाकर भालेराव हे देखील पांढरवाडी येथून अभियानात सहभागी झाले.

यावेळी संवाद साधताना आ.निलंगेकर म्हणाले की, भौगोलिक परिस्थितीनुसार मराठवाडा आणि लातूर जिल्ह्यात अत्यंत कमी पाऊस पडतो.त्यामुळे या परिसरात कायम पाणीटंचाई असते.महिला - पुरुषांना पाण्यासाठी भटकावे लागते. सिंचनाला तर पाणी मिळतच नाही.ही परिस्थिती दूर करण्यासाठी राज्य शासनाने समुद्रात वाहून जाणारे पाणी मराठवाड्याला देण्याचा निर्णय घेतला आहे.या अभियानाच्या माध्यमातून मराठवाड्याच्या मातीची तहान भागविण्यासाठी साथ द्या,असे आवाहन त्यांनी केले.





मागील तीन दिवसांपासून सुरु असणाऱ्या जलसाक्षरता अभियानात गुरुवारी उपस्थितांशी संवाद साधताना आ.निलंगेकर म्हणाले की मराठवाड्यात अत्यंत कमी पाऊस पडतो त्यामुळे दुष्काळ पाचवीला पुजलेला आहे.अशा स्थितीत सिंचनासाठी सोडा पिण्यासाठीही पाणी मिळत नाही.ही परिस्थिती बदलण्यासाठी राज्य शासनाने समुद्रात वाहून जाणारे पाणी मराठवाड्याला देण्याचा निर्णय घेतला आहे.हे पाणी मांजरा व तेरणा खोऱ्यात सोडावे,ही आपली प्रमुख मागणी असून यासाठी जनरेटा आवश्यक आहे. त्यासाठीच हे अभियान सुरू केले असून मराठवाड्याच्या मातीची तहान भागविण्यासाठी आपण सर्वांनी साथ द्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

आमदार निलंगेकर यांच्या नेतृत्वातील जलसाक्षरता अभियान तिसऱ्या दिवशी शिरूर अनंतपाळ येथे नगरपंचायत,ग्रामपंचायत व सोसायटीचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी,गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी, महिला बचत गट सदस्य तसेच असंख्य महिला व पुरुषांनी यात सहभाग घेतला.विशेष म्हणजे गुरुवारी नव्याने ५०० दुचीकी व त्यावरील १ हजार तरुण जलयोद्धे म्हणून रॅलीत सहभागी झाले. गावोगावी ढोल-ताशा व हलगीच्या निनादात, फटाक्यांची आतिषबाजी तसेच गुलाल व फुलांची उधळण करत दुचाकी रॅलीचे स्वागत करण्यात आले.

## संपादकीय....

# ऐतिहासिक निर्णय

केंद्रातील मोदी सरकारने ऐतिहासिक निर्णय घेत लोकसभा आणि विधानसभा दोन्हींमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षणाचे विधेयक आणले. विशेष म्हणजे या निर्णयाचे विरोधकांनीही स्वागत केले आहे. नवीन संसदभवनात कामकाजाच्या पहिल्या दिवशी केंद्रीय विधी आणि न्यायमंत्री अर्जुनराम मेघवाल यांनी मंगळवारी 'नारीशक्ती वंदन अधिनियम विधेयक' सादर केले आणि चर्चेनंतर ते आज लोकसभेत मंजूरही झाले. महिलांना लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांमध्ये एक तृतियांश आरक्षणाची तरतूद करण्यासाठी राज्यघटनेत १२८वी दुरुस्ती करणाऱ्या विधेयकावर सध्या लोकसभेत चर्चा सुरू आहे. या विधेयकामुळे महिला लोकप्रतिनिधींचा राष्ट्रीय आणि राज्य पातळीवर धोरणांच्या निर्मितीत सहभाग वाढणार आहे. त्याचप्रमाणे नारीशक्ती वंदन विधेयक मंजूर झाल्यावर लोकसभेत महिलांच्या जागा ८२ वरून १८०हून अधिक होणार आहेत. हे विधेयक मंजूर झाल्यानंतर, जनगणनेवर आधारित मतदारसंघ फेररचना पूर्ण झाल्यानंतर महिलांसाठी जागा राखीव ठेवल्या जाणार आहेत.

कायदा लागू झाल्यानंतर महिला आरक्षण १५ वर्षे अनिवार्य ठेवण्याची तरतूद या विधेयकात आहे. सध्याच्या लोकसभेत ८२ महिला लोकप्रतिनिधी आहेत. एकंदर ५४३ सदस्यांच्या तुलनेत ही संख्या १४ टक्के इतकी आहे. अनुसूचित जाती आणि जमातींसाठीच्या आरक्षणाअंतर्गत येणाऱ्या जागांमध्येही अनुसूचित जाती आणि जमातींच्या महिलांसाठी ३३ टक्के आरक्षणाची तरतूद या नारीशक्ती वंदन विधेयकात आहे. महिला आरक्षण विधेयकामध्ये लोकसभा आणि राज्यांच्या विधानमंडळांमध्ये महिलांना एक तृतियांश आरक्षण देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. विधेयकानुसार, महिलांसाठी जागा आवर्तनाच्या आधारावर राखीव ठेवल्या जातील आणि ड्रॉ पद्धतीद्वारे ठरवल्या जातील. तीन सलग सार्वत्रिक निवडणुकांमध्ये एकदा एक जागा महिलांसाठी राखीव ठेवली जाईल.

भारताचे माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांच्या कार्यकाळात सप्टेंबर १९९६ मध्ये महिला विधेयक लोकसभेत मांडण्यात आले होते. मात्र लोकसभेत हे विधेयक मंजूर होऊ शकले नाही आणि त्यानंतर हे विधेयक संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्यात आले होते. या समितीने डिसेंबर १९९६ मध्ये त्यांचा अहवाल दाखल केलेला होता. या विधेयकावर चर्चा होण्यापूर्वीच लोकसभा विसर्जित झाली आणि हे विधेयक रद्द झाले होते. त्यानंतर बाराव्या लोकसभेत माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने हे विधेयक पुन्हा एकदा लोकसभेत मांडले. तत्कालीन कायदामंत्री एम. थंबिदुराई यांनी हे विधेयक संसदेत सादर केले आणि राजद (राष्ट्रीय जनता दल)चे एक खासदार लोकसभेच्या हौद्यात आले आणि त्यांनी या विधेयकाची प्रतच फाडून टाकली. त्याही वर्षी या विधेयकाला खासदारांचे समर्थन मिळवता आले नव्हते. त्यानंतर १९९९, २००२ आणि २००३ मध्ये हे विधेयक सभागृहात मांडण्यात आले. मात्र एकदाही हे विधेयक मंजूर होऊ शकले नव्हते.

काँग्रेस, भाजप आणि डाव्या पक्षाच्या अनेक सदस्यांचा पाठिंबा असूनही या विधेयकाला मंजुरी मिळू शकली नाही हे विशेष. २००८ मध्ये, मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारने हे विधेयक राज्यसभेत मांडले आणि ते ९ मार्च २०१० रोजी १८६ विरुद्ध १ मतांनी हे विधेयक मंजूरही झाले होते. मात्र लोकसभेत मांडण्याकरिता हे विधेयक कधीही यादीत घेतले गेले नाही आणि पंधराव्या लोकसभेच्या विसर्जनाबरोबरच हे विधेयकही विसर्जित झाले. त्याचे कारण असे की, लालू प्रसाद यादव यांचा राजद, जदयू (जनता दल युनायटेड) आणि समाजवादी पक्षाचा या विधेयकाला प्रामुख्याने विरोध होता. त्यावेळी जदयूचे नेते शरद यादव यांनी त्यावेळी विचारलेला एक प्रश्न प्रचंड गाजला होता. ते म्हणाले होते की, ''या कमी केस ठेवणाऱ्या महिला, आमच्या (ग्रामीण भागातील महिला) महिलांचं प्रतिनिधित्व कशा करू शकतील?'' त्यामुळे काँग्रेसप्रणीत यूपीए सरकारला महिला आरक्षण विधेयक दोन्ही सभागृहांत मंजूर करून घेण्याचे धाडस झाले नाही.

स्वातंत्र्यपूर्व काळातही महिलांना राजकीय आरक्षण देण्याची मागणी केली गेली होती. बेगम शाह नवाज आणि सरोजिनी नायडू यांनी १९३१ मध्ये तत्कालीन ब्रिटिश पंतप्रधानांना लिहिलेल्या पत्रात नवीन राज्यघटनेतील स्त्रियांच्या परिस्थितीबाबत उल्लेख केलेला होता. तसेच संविधान सभेच्या चर्चेतही महिला आरक्षणाचा मुद्दा आला होता, पण तो अनावश्यक असल्याचे सांगून या मुद्द्यावर चर्चा टाळली गेली. भारतातील बहुतांश राजकीय पक्षांचे नेतृत्व पुरुषांच्या हातात असल्याने देशातील महिलांची परिस्थिती सुधारण्यासाठी हे विधेयक मंजूर होणे गरजेचे असल्याचे अनेक जाणकारांची मते आहेत. महिला आरक्षणासाठी पाठिंबा देताना, ओबीसी, एससी महिलांना त्यात आरक्षणाची तरतूद असावी, अशी मागणी लोकसभेत अनेक खासदारांकडून करण्यात आली. तसेच हे विधेयक तत्काळ लागू करावे, असे सांगत काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी यांनी विधेयकाला पाठिंबा दिला असला तरी गेल्या २७ वर्षांत कोणत्याही सरकारला महिला आरक्षण विधेयक पुढे आणण्याचे जे धैर्य दाखवणे जमले नव्हते, ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात होणार आहे; परंतु देशाची जनजणना होऊन महिलांसाठी कोणत्या जागा सोडायच्या या प्रक्रियेला वेळ असला तरी महिला आरक्षण विधेयक दोन्ही सभागृहांत मंजूर करून त्याचे आगामी काळात कायद्यात रूपांतर करण्याचे काम मोदी सरकारच्या कार्यकाळात झाले, याचे श्रेय मोदींनाच जाईल आणि त्याची इतिहासात नोंद होईल.

# माणसांसाठी आसुसलेली माणसे अन् बंद घरे

पंचविस वर्षापूर्वीचं कोकण ज्यांनी पाहिलय, अनुभवलेय त्यांना पूर्वीच्या माणसांनी भरलेली घरं आणि वाडी–वस्तीत दोन–पाच फक्त नावाला उघडी असणारी घरं आणि आजूबाजूला घर मालकाची वाट पहाणारी घरं असं विदारक; परंतु वास्तववादी चित्र अखंड कोकणात आहे. प्रगती ही होतच रहाणार, ती व्हायलाच हवी. प्रगती कोणाला थांबवता येत नाही. पूर्वी जे गावात, शेती, फळ बागायतीतून जे मिळायचे त्यात आनंद मानून समाधानानं राहणारी माणसं होती. गरजा, आवश्यकता यांना मर्यादेचं आपोआपच कुंपन होतं. कोणतीही स्पर्धा नव्हती. पण गावात वितंडवाद नव्हतेच असं नाही. असे वाद पुष्कळ, अगदी पैशाने पासरी म्हणावे असे होते; परंतु त्यातही कोकण भरलेले गजबजलेलं होतं.

गावात म्हणाल, तर एखादी स्कुटर, सायकल चालवणाऱ्यांची आणि दारात सायकल असणाऱ्यांची संख्याही फारशी नव्हती. पण परोपकारी वृत्ती मात्र तशीच होती. अनेक चांगल्या गोष्टी होत्या. ज्याचे आपोआप संस्कार होत राहिले. शाळेत शिक्षक पोटतिडकीने शिकवायचे. मुलंही घरच्यांना त्यांच्या शेतीच्या कामात मदत करीत. काही मुलांना अंगावर कपडे नाहीत म्हणून शाळेतही जाता येत नव्हते. पण तरीही शिकण्याची आणि मुलांनी शिकावं म्हणून धडपडणारे आई–बाप होते. गावात राहणाऱ्यांना त्याकाळी कुणाला कुणाचीच भिती म्हणून वाटायची नाही. आजच्यासारखे रोगही नव्हते आणि डॉक्टर आणि रुग्णांची फसवणूक करणाऱ्या आरोग्य तपासणाऱ्या मशीनरीही नव्हत्या. पण कुठल्यातरी झाड–पाल्याच्या औषधाने गावातील रुग्ण दोन दिवसांत हिंडता–फिरता व्हायचा. आज सारेच बदललेय. हा बदल इतका होत गेलाय की, गावा–गावातून माणसांची संख्याच नगण्य होत चालली आहे. पूर्वीची हसती–खेळती कुटुंबे कुलूपबंद घर पाहिल्यावर अस्वस्थ व्हायला होतं. गेल्याच आठवड्यात एका ओळखीच्या गावात जाणं झालं. सत्तरीपार केलेली आजीबाई आणि असं चौकटीतले कुटुंब राहातं. खूप गप्पा झाल्या.



बोलता–बोलता सत्तरवर्षीय महिला काहीशा भावुक झाल्या आणि म्हणाल्या, माझी मुलं मला खूप चांगलं करतात. पण दिवसभर घरात माणसं नाहीत. शेजारच्या घरातूनही जी आहेत, ती वयोवृद्ध माणसं स्वतःचा तोल सावरता न येणारी यामुळे कधी–कधी वृद्धाश्रमात माणसांमध्ये जावं असं वाटते. वयोपरत्वे मनही खूप घाबरते. गावात शेजारी–पाजारी कोणी नाहीत. कधी–कधी काहीच सूचत नाही, असं त्या म्हणाल्या. खरंतर त्यांनी जे बोलता–बोलता सांगितले, पण गावात शेजारी कोणी माणसं नाहीत, हेच त्यांच्या घाबरण्याचे कारण आहे. अर्थात गावाकडे कोणत्या रोजगाराच्या फार संधी नाहीत. असल्याच तरी दिवसभर कामावर तर जावच लागणार नाहीतर कुटुंब कसं चालणार, असे नानाविध प्रश्न समोर उभे झालेले असतात.

अखंड कोकणातील प्रत्येक गावात ही अशीच स्थिती आहे. पूर्वीच्या भरलेल्या घरातील कुटुंबीय पोटापाण्यासाठी शहराकडे वळलेले आहेत. गावात काही मोजके तरुण शेती करून नवीन काही प्रयोग करण्याचा प्रयत्न करतात. या प्रयोगशीलतेतून काही तरुणांनी आपल्या कुटुंबात सधनताही आणली आहे. अर्थात जबाबदारी ही वय पाहून येत नाही. ही येणारी जबाबदारी पुढील कर्तव्य पार पाडण्यासाठीच खांदे मजबूत करून जातात, एवढ मात्र खरं. मुंबईत ज्यांचं मन रमत नाही, ज्यांची गावात घरं आहेत आणि सेवानिवृत्ती घेतली आहे. ज्यांना शक्य आहे त्यांनी गावी यायला पाहिजे. ही बंद असलेली घर उघडी राहतील, हे पाहिले पाहिजे. आपल्या घराच्या शेजारी असणारी वयोवृद्ध माणसं बोलण्यासाठी आसुसलेली आहेत. त्यांना त्यांच्याशी कोणीतरी बोलणारं हवं आहे. व्हॉट्सअॅपमध्ये रमणारी आजची पिढी असली तरीही पूर्वीच्या या वृद्धाला संवादातून आनंद मिळतोय. खरं तर यावर समाजाने वेळीच विचार केला नाही तर आपल्याच घरची माणसं त्यांच्याशी संवाद साधायलाच कोणी नाही, म्हणून अबोल होऊन जातील. ही गंभीर समस्या निर्माण होऊ शकते.

शिक्षणासाठी परदेशात जाणारी मुलं भारतात परतायच्याच मानसिकतेत नाहीत. शिकायला म्हणून परदेशात जातात. तिथलं रहाणीमान, चौकटीतल विश्व, स्वच्छता आणि बरच काही या सर्वांमध्ये ही मुलं फार रमतात आणि ज्या देशात जातात, मग तिथलीच होऊन जातात. शहरात आणि गावात आई–वडील व्हीडिओ कॉलच्या संभाषणात आनंद मानतात. मुलगा, सून, मुलगी परदेशात असल्याचा अभिमान बाळगतात, अभिमानाने समाजालाही सांगतात; परंतु मनातून मात्र ही माणसं फार दुःखी असतात. मुलं आपल्यासोबत नाहीत, या कल्पनेनेच त्यांच्या डोळ्यांच्या कडा आपसूकच ओलावतात. सध्या कोकणात काय आणि शहरात काय हीच स्थिती आहे. अस्वस्थ मनांच्या माणसांना दररोजच्या चार शब्दांतूनही जगण्यासाठी उभारी मिळू शकते. यासाठीच गावाकडच्या घरात एखाद कुटुंब तरी वावरले पाहिजे.

# गंगासागर बेट नष्ट होण्याचा धोका

गंगा नदी अडीच हजार किलोमीटरहून अधिक प्रवाही क्षेत्रातच प्रदूषित झालेली नाही, तर बंगालच्या उपसागरात समुद्राला मिळते, तिथेही तिच्या अस्तित्वालाही धोका निर्माण झाला आहे. हवामानबदलाचा सर्वाधिक फटका बंगालच्या उपसागराला बसत असून त्यामुळे गंगासागर बेट नष्ट होण्याची शक्यता वाढली आहे. हे नेमके का आणि कसे घडत आहे? ते कसे टाळता येईल?

गंगासागर हे कोलकात्यापासून सुमारे शंभर किलोमीटर अंतरावर असलेल्या सुंदरबन द्वीपसमूहातील सर्वात मोठे बेट आहे. या बेटाची लोकसंख्या वाढत असली तरी क्षेत्रफळ कमी होत आहे. त्याचा फटका संपूर्ण परिसराला बसला आहे. १९६९ मध्ये गंगासागर बेटाचे क्षेत्रफळ २५५ चौरस किलोमीटर होते. मात्र दहा वर्षांनंतर ते २४६.७९ चौरस किलोमीटर इतके कमी झाले. २००९ मध्ये ते आणखी कमी होऊन २४२.९८ चौरस किलोमीटर इतके झाले. २०१९ मध्ये ते २३०.९८ चौरस किलोमीटरपर्यंत कमी झाले. २०२२ मध्ये त्याचे क्षेत्रफळ आणखी कमी होऊन २२४.३० चौरस किलोमीटर झाले. गेल्या ५२ वर्षांमध्ये गंगासागरची ३१ चौरस किलोमीटर जमीन समुद्रात बुडाली आहे. चेन्नईस्थित 'नॅशनल सेंटर फॉर सस्टेनेबल कोस्टल मॅनेजमेंट' पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या डेटावरून असे दिसून आले आहे की, पश्चिम बंगालमधील समुद्राची सीमा ५३४.४५ किलोमीटर आहे. सुंदरबनमधील सुमारे १०२ बेटांना धोका निर्माण झाला आहे. घोरमारा बेटावर धूप वाढल्यानंतर लोकसंख्या गंगासागरकडे स्थलांतरित होऊ लागली. तसेच शिकारीअभावी गोसाबा बेटावरील रॉयल बंगाल टायगर्स गावागावात घुसून नरभक्षक बनत आहेत, तेव्हा या बेटावरून पळून जाणाऱ्या लोकांसाठी सागर बेट हे एकमेव आश्रयस्थान आहे. गंगासागर बेट हे सरकार आणि समाजाच्या देखरेखीखाली असल्याने येथे स्थायिक झाल्यास आपले प्राण वाचतील असे लोकांना वाटते. मात्र बेटावर धूप वाढत आहे. १४३७ मध्ये स्थापन झालेले कपिल मुनी मंदिर अनेक दशकांपूर्वी समुद्रात बुडाले होते. त्यानंतर गेल्या शतकात १९७० च्या दशकात समुद्रापासून २० किलोमीटर अंतरावर दुसरे मंदिर बांधले, त्याला जलसमाधी मिळाली. तिथल्या मूर्तीची नवीन मंदिरात प्रतिष्ठापना करण्यात आली होती. पण त्या मंदिराचे समुद्र किनाऱ्यापासूनचे अंतर आता केवळ ३००–३५० मीटर राहिले आहे.

हिमनद्या वितळल्यामुळे तापमान वाढत असून समुद्राची पातळी वाढत असल्याने गंगासागरची जमीन सरकत आहे. येथील पाणीपातळीत दरवर्षी सरासरी २.६ मिलीमीटर वाढ नोंदवण्यात आली आहे. पर्यावरण–केंद्रित आंतरराष्ट्रीय संशोधनपर वाहिलेल्या 'जर्नल स्प्रिंगर नेचर'मध्ये प्रकाशित झालेल्या लेखानुसार, सागर बेटाच्या दक्षिणेकडील सिबपूर–धबलत, बंकिमनगर–सुमतीनगर आणि बेगुआखली–महिष्मारी या दक्षिणेकडील भागात आणि संपूर्ण बेटाच्या १५.३३ टक्के लोकसंख्येला उच्च श्रेणीचा धोका आहे आणि त्यांना मातीची तीव्र धूप आणि हवामान बदलांचा सामना करावा लागत आहे.

गंगासागराच्या आजूबाजूची बेडफोर्ड, लोहाचारा, खासीमारा आणि सुपारीवांगा ही चार बेटे गेल्या काही दशकांमध्ये किनारपट्टीच्या धूपामुळे नाहीशी झाली आहेत. सागर बेटातील बिशालक्षीपूर भाग पाण्याखाली गेला असून अति धूप झाल्याने सागर भागही राहण्यायोग्य राहिलेला नाही. घोरामारा बेटही लवकरच पाण्याखाली जाणार आहे. गंगासागरावर चक्रीवादळ वाढण्याचा धोका आहे. समुद्राच्या तापमानात ०.१ अंश वाढ म्हणजे चक्रीवादळांना अतिरिक्त ऊर्जा मिळते. येत्या काही दिवसांमध्ये चक्रीवादळांची संख्या आणि तीव्रता वाढणार आहे. आयआयटी मद्रासच्या एका गटाने सरकारला सुचवले होते, की गंगासागरभोवती सिमेंटचा बांध बांधला जावा. त्यामुळे तीन–चार दशकांपर्यंत जमिनीची धूप रोखता येईल. मात्र सरकारने ते मान्य केले नाही.

गंगासागरचा किनारी भाग अतिक्रमणमुक्त करून खारफुटीचा विस्तार करण्याची गरज आहे. समुद्रात जाणाऱ्या गंगा नदीच्या प्रवाहाच्या अतिक्रमणामुळे आणि वाळूमुळे अरुंद मार्ग रुंद करणे, येथील लोकसंख्येवर नियंत्रण ठेवणे, पॉलिथीन, साबणाचा वापर करणे आवश्यक आहे. धार्मिक विधींमध्ये रासायनिक पदार्थांवर बंदी घालावी आणि कचरा व्यवस्थापन कडक करावे, असे सुचवण्यात आले होते. 'ग्लोबल वॉर्मिंग'मुळे होणारे हवामानबदल वेळीच रोखले नाही, तर जीवन देणारी गंगा पूर आणून विनाश करेल. जगातील अन्न उत्पादनावर विपरीत परिणाम झाल्याने उपासमारीची समस्या तीव्र होणार आहे. ब्रिटनच्या एक्सेटर विद्यापीठाच्या संशोधकांनी हा दावा केला आहे. त्यांच्या अहवालानुसार तापमानात दोन अंशांनी वाढ झाल्यास गंगेचा प्रवाह दुप्पट होईल. भारतातील लोकांसाठी जीवनदायी असलेल्या शुद्ध गंगेबाबत उत्तराखंडच्या 'वाडिया इन्स्टिट्यूट ऑफ हिमालयन जिऑलॉजी'ने मोठे संशोधन केले आहे. या संस्थेच्या अहवालात म्हटले आहे की, भविष्यात हवामानबदल असाच चालू राहिल्यास गंगा नदीदेखील सरस्वती नदीप्रमाणे नामशेष होईल. याचे मुख्य कारण म्हणजे जागतिक तापमानवाढीमुळे गंगोत्री हिमनदी वेगाने वितळू लागली आहे. गंगा नदी भारताची जीवनरेखा आहे. येथील प्रत्येक नागरिक मोठ्या अभिमानाने सांगतो की गंगा नदी भगीरथाने शेकडो वर्षांच्या तपश्चर्येनंतर आपल्या पूर्वजांना मुक्त करण्यासाठी स्वर्गातून पृथ्वीवर आणली होती.

गंगा नदी देशाच्या जलसंपत्तीचे प्रतीक मानले जाते. जीवनरेखा असलेल्या त्याच गंगेचा जीव धोक्यात आला आहे. गंगोत्री हिमनदी वितळण्याचा वेग वाढत आहे. गंगोत्री हे गंगा नदीचे उगमस्थान आहे. गेल्या ८७ वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणात हिमनग घसरले आहेत. ते चिंताजनक आहे. १९३५ ते २०२२ पर्यंत गंगोत्री हिमनदीच्या तोंडाचा भाग सुमारे अडीच किलोमीटरपर्यंत वितळला आहे. अतिवृष्टीमुळे केवळ डझनभर हिमनद्यांचा अभ्यास केला जात आहे. उत्तराखंडमधील गंगोत्री ग्लेशियर ही हिमालयातील सर्वात मोठी हिमनदी आहे. त्याची लांबी सुमारे ३० किलोमीटर, रुंदी ०.५ ते २.५ किलोमीटर आणि क्षेत्रफळ सुमारे १४३ चौरस किलोमीटर आहे. ३,९५० मीटर उंचीवर गायमुखच्या मुखाशी उगम पावणाऱ्या या हिमनदीतील वितळलेले पाणी हा भगीरथी नदीचा प्रमुख स्त्रोत आहे. ही नदी देवप्रयाग येथे अलकनंदा नदीत जाऊन गंगा बनते. हिमालयात ९,५७५ हिमनद्या आहेत. त्यापैकी ९६८ एकट्या उत्तराखंडमध्ये आहेत. सध्या शास्त्रज्ञ आणि संशोधक राज्यातील गंगोत्री, चोराबारी, दुनागिरी, डोकरीयानी आणि पिंडारी आदी दोन डझनहून कमी हिमनद्यांचे निरीक्षण करत आहेत. हवामानातील बदल आणि काळा कार्बन हे घटक हिमनदी वितळण्यास कारणीभूत ठरतात. हिमालय सध्या दोन प्रकारच्या प्रदूषणामुळे प्रभावित आहे. त्यात बायोमास प्रदूषण, म्हणजे कार्बन डाय ऑक्साईड आणि घटक प्रदूषण, म्हणजेच घटक–आधारित प्रदूषण मुख्य आहेत. 'ग्लोबल वार्मिंग'मुळे होणारे हवामानबदल या प्रकारच्या प्रदूषकांना गती देतात आणि दोन्हीमुळे काळ्या कार्बनची निर्मिती होते. त्यामुळे हिमनदीच्या जीवनाला धोका निर्माण होतो.

प्रामुख्याने हिमालयात जमा होणारा काळा कार्बन आणि तापमानात सतत होणारी वाढ यामुळे हिमनद्या वेगाने वितळत आहेत. तीन वर्षांपूर्वी 'सायन्स डव्हान्सेस'मध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासात म्हटले आहे की भारतासह संपूर्ण हिमालयीन प्रदेशात वाढत्या तापमानामुळे दरवर्षी सरासरी ०.२५ मीटर हिमनद्या वितळत आहेत, तर २००० पासून दरवर्षी अर्धा मीटर हिमनद्या वितळत आहेत. २००० पासून १९७५ ते २००० दरम्यान वितळलेल्या बर्फाचे प्रमाण दुप्पट झाले आहे. या अभ्यासात भारत, चीन, नेपाळ आणि भूतान या हिमालयीन प्रदेशातील ४० वर्षांच्या उपग्रह प्रतिमांचे विश्लेषण करण्यात आले. यासाठी संशोधकांनी सुमारे ६५० हिमनगांच्या उपग्रह प्रतिमांचे पुनरावलोकन केले. हिमनद्या वितळण्याचे कारण म्हणजे हिमवर्षाव आणि तापमानात झालेली वाढ. या सर्व कारणांसाठी आपण सर्वजण कुठे तरी दोषी आहोत, कारण कार्बन फुटप्रिंट वाढत जाते तसतशी तापमानवाढ होते. त्यामुळे हवामानबदल होतो. हिमनदी सध्याच्या वेगाने वितळत राहिल्यास गंगोत्री हिमनदी सुमारे दीड हजार वर्षांमध्ये पूर्णपणे वितळू शकते. यामुळे ओढ्याखाली येणारी शेते आणि कोठारे नष्ट होतील. हवामानबदलामुळे जगभरात काही ठिकाणी दुष्काळ आणि पुरामुळे तीव्र अन्नटंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. अन्नसुरक्षा धोक्यात येत असताना जगाच्या विविध भागांमध्ये हवामानबदलाचे वेगवेगळे परिणाम होतील. काही ठिकाणी प्रचंड पूर येईल, तर काही ठिकाणी भीषण दुष्काळ पडेल. अनियमित हवामानामुळे स्वच्छ पाण्याची उपलब्धता हे आताच्या तुलनेत मोठे आव्हान बनणार आहे. त्यामुळे मोठ्या लोकसंख्येसाठी पुरेसे पौष्टिक अन्न पिकवणे कठीण होईल.

सध्या जगातील अंदाजे आठ कोटी लोकांना नियमित अन्न मिळत नाही.

# लिपस्टिक निर्मितीसाठी केला जातो प्राण्यांचा वापर; जाणून घ्या लिपस्टीक कशी बनते



अनेक महिला चेहऱ्याचे सौंदर्य वाढवण्यासाठी विविध प्रकारचा मेकअप करतात हे आपल्यापैकी प्रत्येकालाच माहिती आहे. प्रत्येक महिलेच्या मेकअप किटमध्ये विविध गोष्टी असतात. त्यात लिपस्टिकचाही समावेश असतो.

एखाद्या महिलेला मेकअपची फारशी आवड नसली तरी, तिच्या मेकअप किटमध्ये लिपस्टिक सापडतेच. आज बाजारात लिपस्टिकच्या अनेक प्रकारच्या शेड्स उपलब्ध आहेत. मात्र, अनेकांना ही लिलस्टिक नेमकी कशी बनते हे माहिती नाही. आज आम्ही तुम्हाला लिपस्टीकची निर्मिती कशी होते आणि त्यासंबंधी काही मजेदार तथ्यांबद्दल सांगणार आहोत.

लिपस्टिकमध्ये कोणत्या गोष्टी वापरल्या जातात?लिपस्टिक तयार करण्यासाठी तेल, मेण, पिगमेंट्स, फ्रॅग्रेंस यासह अनेक गोष्टींचा वापर केला जातो. लिपस्टिकच्या दीर्घायुष्यासाठी यात अनेक प्रकारचे प्रिझर्व्हेटिव्ह आणि अल्कोहोलसह अनेक गोष्टींचा वापर कंपन्यांकडून केला जातो, परंतु या सर्वांची माहिती सार्वजनिक केली जात नाही.कशी तयार केली जाते लिपस्टिक?

लिपस्टिकची निर्मिती करतान यामध्ये सर्वप्रथम पिगमेंट्स मिसळली जातात. पिगमेंट्सच्या मदतीने विविध रंग आणि शेड्स तयार केल्या जातात. या मिश्रणात तेल आणि पिगमेंट्स २ : १ च्या प्रमाणात असतात.मोल्डिंग प्रक्रिया वरील प्रक्रियेनंतर एका विशिष्ट तापमानात मोल्डिंगची प्रक्रिया केली जाते. त्यानंतर ते वेगाने थंड केले जाते. मोल्डिंग प्रकियेदरम्यान या मिश्रणात कोणत्याही प्रकारची हवा जाणार नाही याची दक्षता घेतली जाते. थंड झाल्यानंतर ते थंड करून त्याच्या काड्या बनविल्या जातात. त्यानंतर फिनिशिंगचे काम करून ते पॅक करून बाजारात विकले जाते.

पहिली व्यावसायिक लिपस्टिक

लिपस्टिकचा वापर फार पूर्वीपासून केला जात आहे. पूर्वीच्या स्त्रिया दगड फोडून त्याच्या रंगापासून ओठ रंगवत असत. त्यानंतर पहिली व्यावयायिक लिपस्टिक विक्रीसाठी म्हणून १८८४ मध्ये फ्रेंच ब्रँड गुर्लेनने बनविली होती. आता हा ब्रँड जगातील सर्वात महाग लिपस्टिक बनवण्यासाठी ओळखला जातो.

लिपस्टिक निर्मितीसाठी केला जातो प्राण्यांचा वापर

प्राचीन काळापासून, लिपस्टिक तयार करण्यासाठी प्राणी आणि कीटकांच्या शरीराच्या विविध अवयवांचा वापर केला जात आहे. मात्र, आता अनेक कंपन्या वेगन उत्पादने बनवण्यावर भर देत आहेत. अनेक ब्रँड्सकडून व्हेगन लिपस्टिक आणि मेकअप उत्पादने बनवण्यास सुरुवात करण्यात आली आहे. परंतु बाजारातील अनेक मेकअपच्या उत्पादनांमध्ये प्राण्यांच्या त्वचेपासून इतर अवयवांपर्यंतचा वापर केला जातो.

डिस्क्लेमर : सदर लेख फक्त सामान्य माहितीसाठी आहे. सकाळ माध्यम समूह अशा कोणत्याही गोष्टींची पुष्टी करत नाही.

# गरम पाण्यात दडलंय ग्लोइंग त्वचेचं रहस्य जाणून घ्या काय म्हणतात एक्सपर्ट




सोशल मीडियावर हल्ली बऱ्याच गोष्टी व्हायरल होत असतात. अलीकडे सोशल मीडियावर अशीच एक पोस्ट व्हायरल होतेय. यात गरम पाणी पिण्याचे बरेच फायदे सांगितल्या गेले आहेत. तसेच तुमच्या चेहऱ्यावर चमक आणण्यात गरम पाणी फायदेदायी असल्याचा दावा या पोस्टमध्ये करण्यात आलाय. चला तर जाणून घेऊया पोस्टमागील सत्य काय ते.

गरम पाणी किती प्रमाणात फायदेदायी?

एक्सपर्ट्स यावर म्हणतात, गरम पाणी पिल्याने घाम येतो जो शरीरातील टॉक्झिक पदार्थ बाहेर काढतो. टॉक्झिक पदार्थ शरीराबाहेर काढण्याचा हा नैसर्गिक उपाय आहे. तसेच गरम पाणी तुमच्या शरीरात सायनस कंजेशन सुधारतं आणि डोळ्यांच्या आजूबाजूची सूजन कमी करते. शिवाय तुमची पाचनशक्ती आणखी प्रबळ करते. त्यामुळे इंटेस्टाईन साफ राहाते आणि त्वचाही चांगली दिसते. मात्र एक्सपर्टच्या मते, गरम पाण्याचा शरीराला थेट फायदा फार कमी प्रमाणात होतो. मात्र ते शरीराला डिटॉक्स करतं यात काही शंका नाही असेही एक्सपर्ट म्हणाले. गरम पाणी त्वचेला हायड्रेट करत ड्रायनेस आणि फ्लेकीनेसला मॉश्चराईज करते. डॉक्टरांच्या मते, गरम पाणी पिल्याने ब्लड सर्क्युलेशन वाढते आणि रक्तपुरवठा सुरळीत होतो. आणि तुमची त्वचा निरोगी राहाते. म्हणूनच दररोज ३ ग्लास पाणी पिणे अनिवार्य आहे.

खरंच गरम पाण्याने त्वचा ग्लो करते काय?

तुम्ही गरम पाणी पिताय पण त्यातही तुमचं डाएट बरोबर नाही किंवा तुम्ही स्मोकिंग किंवा ड्रिंकिंग करत असाल तर तुमची स्कीन ग्लोइंग होणार नाही. त्यासाठी तुमची झोप आणि आहार दोन्ही योग्य हवेत. अन्यथा ग्लोइंग त्वचेचा फायदा तुम्हाला मिळणार नाही.

# अन् Moisturizer मध्ये नेमका फरक काय तुम्हाला ठाऊक आहे काय वाचा एका क्लिकवर

त्वचेची निगा राखण्यासाठी आपण वेगवेगळे ब्यूटी प्रोडक्ट्स वापरत असतो. त्वचेला टॅनिंगपासून वाचवण्यासाठी आपण कधी आपण सनस्क्रिन लावतो तर कधी आपण मॉश्चरायझर लावतो. पण हे दोन्ही प्रोडक्ट लावताना यातील कुठली क्रिन कधी फायदेदायी असते ते तुम्हाला ठाऊक आहे काय? चला तर यातील फरक जाणून घेऊया.

आपल्या त्वचेला ड्रायनेसपासून वाचवण्यासाठी आणि त्वचेचा ओलावा टिकवून ठेवण्यासाठी आपण मॉइश्चरायझर वापरतो. हिवाळ्यात आपली त्वचा सर्वाधिक कोरडी पडत असल्याने आपण मॉइश्चरायझरचा सर्वात जास्त वापर करतो. मॉइश्चरायझर तुम्ही तुमच्या त्वचेच्या प्रकारानुसार वापरू शकता. ते सहसा अंघोळीनंतर व झोपण्याआधी लावले जाते. सनस्क्रीन लावण्यापूर्वी मॉइश्चरायझरचा वापर केला जातो.

सनस्क्रिनचा वापर कधी करावा?

सनस्क्रीन ही अशी क्रीम आहे जी आपण टॅनिंग आणि सूर्यापासून हानिकारक किरण टाळण्यासाठी लावतो. आपल्या शरीराचे जे भाग सूर्यप्रकाशामुळे प्रथम टॅन होतात त्या भागांवर आपण सनस्क्रीनचा वापर करतो. जसे की चेहरा, हात, मान आणि पाठ. चेहरा धुतल्यानंतर मॉइश्चरायझर लावले जाते आणि मग त्यावर सनस्क्रीन लावले जाते. सनस्क्रीनला सनब्लॉक, सनबर्न क्रीम आणि सनटॅन लोशन असेही म्हणतात.

सनस्क्रिन की मॉइश्चरायझर दोघांपैकी काय चांगले?

या दोन्ही क्रीमना स्वत:चे महत्त्व आहे. एक क्रीम आपल्या त्वचेला मॉइश्चरायझ करते आणि दुसरे सूर्याच्या हानिकारक किरणांपासून संरक्षण करते. जर तुमची त्वचा कोरडी नसेल तर तुमच्यासाठी सनस्क्रीन वापरणे आवश्यक आहे. पण जर तुमची त्वचा कोरडी असेल तर तुम्ही दोन्ही वापरावे. बाहेर जाण्यापूर्वी सनस्क्रीन लावायला विसरू नका. आपण उन्हाळ्यात तसेच हिवाळ्यात सनस्क्रीनचा वापर



केला पाहिजे.

# मनुक्यांचं पाणी प्या अन् ॲसिडिटी ते कॅन्सरपासून दूर रहा, जाणून घ्या

मनुक्यांचे आयुर्वेदात अनेक उपाय सांगितले आहेत. आपण अनेक खाद्या पदार्थांमध्येही ते आवर्जून घालतो. पण आता फक्त चवीसाठी नाही तर आरोग्यासाठी मनुका खाव्या. म्हणून त्याचा उत्तम फायदा मिळण्याच्या दृष्टीकोनातून कशा पध्दतीने मनूका खाव्यात ते सांगत आहोत. मनुकेच नाहीत तर मनुक्यांचे पाणीही आपल्या आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर आहे.मनुक्यांचे पाणी आपल्या शरीराला ऊर्जा देण्याचे एक उत्तम स्रोत मानले जाते. हृदयाचे आरोग्य सुधारण्यापासून ते आपली रोग प्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठीही मनुक्यांचे पाणी फायदेशीर आहे.मनुक्यांचे पाणी प्यायल्याने आपल्या शरीरातील सर्व हानिकारक विषारी पदार्थ बाहेर टाकण्यास मदत होऊ शकते.यकृताची मेटाबोलिझम प्रक्रिया सुधारते आणि आपले रक्त शुद्ध करण्यास मदत करते. हे पाणी आपले यकृत सहजपणे डिटॉक्स करते.जर तुम्हाला ॲसिडिटीची समस्या भेडसावत असेल तर मनुक्याचे पाणी पिणे एक उत्तम उपाय आहे. हे पाणी तुमच्या पोटातील ॲसिड नियंत्रित करते.

मनुक्यांच्या पाण्यात अँटिऑक्सिडंट असतात जे आपली रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यास मदत करतात.रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी या पाण्याचा दैनंदिन आहारात समावेश करणे फायदेशीर ठरू शकते.सकाळी मनुक्यांचे पाणी प्यायल्याने वजनही कमी होण्यास मदत होते. मनुका फ्रुक्टोज आणि ग्लुकोजने समृद्ध असतात जे आपल्याला उर्जा देते. त्यामध्ये फायबरदेखील असते ज्यामुळे आपल्याला जास्त काळ पोट भरल्यासारखे वाटते.

# पन्नाशीनंतरही माधूरीसारखं दिसायचंय स्टायलिश 'या' पाच टिप्स फॉलो करा



फॅशनचं ट्रेंड दरदिवशी बदलत असते. अशात ट्रेंडीग फॅशनमध्ये स्वत:ला अपडेट ठेवणे खूप गरजेचं असतं. प्रत्येकाला सुंदर आणि वेगळं दिसण्याची इच्छा असते. यासाठी अनेकजण वेगवेगळ्या प्रकारच्या फॅशन टिप्स फॉलो करतात. मात्र वाढत्या वयासोबत फॅशन करणे आणखी कठीण होतं.पन्नाशीनंतर फैशनेबल ट्रेंडला फॉलो करणे हे एक आव्हान असतं. पण काही टिप्स फॉलो करुन तुम्ही कोणत्याही वयात खूप स्टायलिश दिसू शकता. चला तर जाणून घेऊया या टिप्स. रेड लिपस्टिकचा वापर करा बोल्ड लुक आपल्या फॅशनला हॉलीवुड इफेक्ट देतो. जर तुम्ही तुमच्या फॅशन मध्ये रेड लिपस्टिकचा समावेश कराल तर तुमचा लुक अधिक आकर्षित दिसू शकतो. रेड लिपस्टिक तुमच्या चेहऱ्यावर तेज आणते आणि तुमच्या दातांना अधिक पांढरे दिसण्यास मदत करते.स्टायलिश आणि मोठ्या नेकलेसचा वापर करणे तुम्ही अनेकदा पार्टींमध्ये सेलिब्रिटींना मोठमोठे नेकलेस घातलेले बघितले असेल कारण असे नेकलेस तुमच्या लुकला अधिक आकर्षित बनवतात. स्टायलिश नेकलेस सहसा लोकांच्या नजरेत येतात. त्यामुळे स्टायलिश नेकलेस आवडीने घाला. पांढऱ्या रंगाचा पँट घाला ब्लॅक पँट खूप जूना फॅशन ट्रेंड आहे. जर तुम्हाला हजारो लोकांमध्ये उठून दिसायचंय तर काळ्या पँट ऐवजी पांढरा पँट घाला. तुम्ही पांढरा रंगाचा जीन्स किंवा बेल बॉटम पँटपण घालू शकता.सफेद शर्ट किंवा ब्लाउज घाला स्टाइलिश सेट मध्ये पांढरा रंगाचा सेट असणं गरजेचं आहे. पांढरं शर्ट किंवा ब्लाउज तुम्हाला अभिनेत्रीसारखा लूक देतो. पांढरा रंग तुम्हाला ॲक्टीव्ह दाखवतो.स्टाइलिश बूट-सँडल घाला फुटवियर एक अशी गोष्ट आहे जी सहज कोणाच्याही नजरेत सहज येते. जर तुम्हाला मॉर्डन फॅशन ट्रेंडनुसार चालायचं असेल तर याकडे विशेष काळजी घेणे गरजेचं आहे. तुम्ही मॅचिंग शुज किंवा सँडल परिधान करू शकता.

# बर्थडे गर्ल कश्मिरा नवी स्टाईल आयकॉन; क्लासी लुकसाठी ती दितेय खास फॅशन टीप्स



नवी स्टाईल आयकॉन म्हणून प्रकाशझोतात आलेली बॉलिवूड अभिनेत्री कश्मिरा शाहचा आज वाढदिवस आहे. मल्टीटॅलेंटेड वूमन म्हणून तिच्याकडे पाहिले जाते. कारण, ॲक्टींग, कॉमेडी यासह फिटनेस,फॅशन याबाबतीतही कश्मिरा चाहत्यांना टीप्स देत असते. कश्मिराने 'हॅलो बॉलीवूड' या टीव्ही शोमधून करिअरची सुरुवात केली होती.कश्मिरा शाह हिने अनेक भारतीय चित्रपटांमध्ये आणि टीव्ही शोजमध्ये काम केले आहे. प्रसिद्ध शास्त्रीय गायिका अंजनीबाई लोळेकर यांची ती नात आहे. कश्मिरा शाहचा जन्म २ डिसेंबर १९७१ रोजी झाला. कश्मिराचे शालेय शिक्षण प्रिन्सेस हायस्कूल, मुंबई येथून झाले. जय हिंद कॉलेज, मुंबई येथून तिने ग्रॅज्युएशन पूर्ण केले. कश्मिराने अनेक हिंदी आणि मराठी चित्रपटांमध्ये काम केले आहे. तिच्या कुटुंबातील विविधतेमुळे ती महाराष्ट्रीयन आणि गुजरातीही आहे.

सध्या ती सोशल मिडीयावर ॲक्टीव्ह असून तिच्या ट्रेंडींग लुकचे फोटोही शेअर करत असते. तूम्हालाही तिच्यासारखे दिसायचे असेल तर तिची हटके स्टाइल कॉपी करा. कोणत्याही ड्रेसमध्ये कंफरटेबल वाटत नसेल. तर, तो ड्रेस आपल्याला घालावा वाटत नाही. त्यामूळे कंफरटेबल फॅशनसाठी तूम्ही काश्मिरासारखा कूर्ता घालू शकता.तुम्ही व्हायब्रंट कव्हर साडी घालू शकता. काश्मीरप्रमाणेच केशरी रंगाच्या साडीसोबत गडद लिपस्टिक लावा आणि साडीवर मॅचिंग ब्लाउज घाला.

जर तुम्ही बीचवर विचार करत असाल, तर तुम्ही पांढरा टॉप आणि स्कर्टसह ॲन्टीक स्टाइलचे दागिने घालू शकता.हिवाळ्यात स्वेटर घातल्याने कोणतीच फॅशन करता येत नाही. अशावेळी ही खास स्टाइल तूम्हाला सूट करेल.

# चुकूनही हे ६ रोपटे घरी किंवा ऑफसमध्ये लावू नका; ठरतील जीवघेणे.

झाडे किंवा वनस्पतींचा फायदा आपल्याला ताजी आणि स्वच्छ हवा देण्यासोबतच इतर अनेक गोष्टींसाठीही होतो. यातील काही झाडे आपल्याला फळे देतात तर काही वनस्पती आपल्याला भाज्या देतात. अशी अनेक झाडे आहेत, जी आपल्यासाठी औषधासारखी काम करतात, तर काही नशीबासाठी चांगली मानली जातात. मात्र प्रत्येक वनस्पतींचा आपल्याला फायदा होईलच असे नाही. काही वनस्पती जीवघेण्याही ठरू शकतात. अशाच वनस्पतींबाबत आज आपण जाणून घेणार आहोत.अशा अनेक वनस्पती आहेत, ज्या विषारी आणि प्राणघातक आहेत. जर त्या चुकून तुमच्या संपर्कात आल्या किंवा त्यांचे सेवन केले तर आरोग्यास हानी पोहोचते, काही वनस्पतींनी माणसाचा मृत्यू देखील होऊ शकतो. यापैकी एक वनस्पती अशी आहे की जिने अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकन यांच्या आईचा बळी घेतला. त्यामुळे घर किंवा ऑफिसमध्ये कोणतेही रोप लावण्यापूर्वी त्याबद्दल थोडे संशोधन नक्कीच करा. आज आम्ही तुम्हाला अशाच ६ विषारी वनस्पतींबद्दल सांगत आहोत, ज्यापासून अंतर राखणे केव्हाही चांगले असते. यामध्ये अशा काही वनस्पतींचा समावेश आहे, ज्या तुमच्या बागेत किंवा जवळपास असू शकतात.व्हाइट स्नेकरूट – व्हाइट स्नेकरूट ही अत्यंत विषारी वनस्पती मानली जाते. या वनस्पतीला लहान पांढरी फुले येतात. एनसीबीआयच्या अहवालानुसार, यामध्ये विषारी अल्कोहोल ट्रेमेटॉल आढळले आहे. मानवी शरीरात चुकूनही या वनस्पतीचा अंश गेल्यास विष पसरते.ऑलिएंडर वनस्पती – ही वनस्पती कनेरा म्हणून ओळखली जाते. या वनस्पतीमध्ये घातक कार्डियाक ग्लायकोसाइड्स आढळतात, ज्यामुळे उलट्या, चक्कर येणे, लूज मोशन आणि कोमा होण्याचा धोका असतो. त्याचबरोबर याच्या पानांच्या स्पर्शाने शरीरात खाज सुटू लागते. याच्या फुलांच्या रसापासून बनवलेले मध माणसाला आजारी पाडू शकतं.रोजरी पी – ही वनस्पती प्रामुख्याने जंगलात आढळते. एनसीबीआयच्या अभ्यासानुसार, त्याच्या मध्यभागी दिसायला अतिशय सुंदर अब्रीन आढळते, जे एक घातक राइबोसोम इनहिबिटरी प्रोटीन आहे. प्रार्थनेसाठी वापरल्या जाणार्या दागिन्यांमध्ये आणि हारांमध्ये याचा वापर केला जातो. ते चघळणे आणि स्क्रॅच करणे घातक ठरू शकते. कारण ३ मायक्रोग्रॅम एब्रिन कोणत्याही माणसाचा जीव घेण्यास पुरेसं ठरते.एरंडीच्या बिया – या अतिशय विषारी असते, त्यातून एरंडेल तेल काढले जाते. भारताच्या अनेक भागांत एरंडीच्या बिया आढळतात. ही एक जंगली वनस्पती आहे आणि ती कुठेही वाढू शकते. एरंडीच्या बिया इतक्या विषारी असतात की थोड्या प्रमाणातही माणसाचा जीव जाऊ शकतात. त्यात रिसिन नावाचे विष असते जे पेशींच्या आत प्रोटीनचे सर्क्युलेशन थांबवते. लरललरींर नावाचं हे वृक्ष युरोप, आफ्रिका आणि आशिया या सर्व प्रदेशात आढळते. त्यावर एक अतिशय सुंदर लाल रंगाचे फळ दिसते. ही वनस्पती दिसायला जितकी सुंदर आहे तितकीच ती धोकादायक आहे. याच्या बियांव्यतिरिक्त संपूर्ण वनस्पतीमध्ये 'टॅक्सीन' नावाचे विष आढळते. या विषाच्या संपर्कात आलेल्या व्यक्तीचा काही क्षणात मृत्यू होऊ शकतो.डेडली नाईटशेड – हे झाड देखील खूप धोकादायक आहे. ट्रॉपीन आणि स्कोपोलामाइन विष त्याच्या देठ, पाने, बेरी आणि मुळांमध्ये सर्वत्र आढळून येते. याच्या सेवनामुळे शरीरातील अनैच्छिक स्नायू स्थिर होतात. त्यामुळे शरीरात पक्षाघात होतो.डिस्क्लेमर – हा लेख फक्त सामान्य माहितीसाठी आहे. हे कोणत्याही प्रकारे कोणत्याही औषधाचा किंवा उपचारांचा पर्याय असू शकत नाही. अधिक तपशीलांसाठी नेहमी आपल्या डॉक्टरांचा सल्ला घ्या.

# अश्विनी हॉस्पिटलमध्ये प्राचार्य केंद्रे यांच्या हस्ते 'श्री'ची आरती

लातूर, दि.२१ – येथील औसा रोडवरील सद्भावनानगरातील अश्विनी ॲक्सिडेंट अँड न्यूरोकेअर सेंटर येथे शहरातील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलाचे प्रमुख प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते गुरुवारी सकाळची श्री गणेशाची आरती व महापूजा करण्यात आली.




यावेळी डॉ. सुधीर फत्तेपूरकर, डॉ. गीता फत्तेपूरकर, डॉ. ऋषिकेश खरोळकर, डॉ. विजय नळगे, शिवकांत वाडीकर, विष्णू कराड, परमेश्वर गित्ते, अनिल वाघमारे यांच्यासह हॉस्पिटलमधील अन्य डॉक्टर व कर्मचारी उपस्थित होते.
सहापैकी एका व्यक्तीला लकवा येण्याची शक्यता असते. त्यामुळे अश्विनी हॉस्पिटलच्यावतीने पक्षाघात जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. यानिमित्त रुग्णांची तपासणी व उपचारात ५० टक्के सवलत देण्यात येत आहे. याबाबत प्राचार्य केंद्रे यांनी समाधान व्यक्त करून डॉ. फत्तेपूरकर दाम्पत्याला शुभेच्छा दिल्या. प्रारंभी प्राचार्य केंद्रे यांच्या हस्ते विघ्नहर्त्या गणरायाची आरती व महापूजा करण्यात आली. यावेळी डॉ. फत्तेपूरकर यांनी प्राचार्य केंद्रे यांचे विठ्ठलाची मूर्ती, शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

## महाराष्ट्र नागरी सहकारी बँकेच्या २७ व्या वार्षीक सर्वसाधारण सभेचे २४ सप्टेबर रोजी आयोजन

लातूर –मराठवाड्यातील बँकींग क्षेत्रात उत्कृष्ठ कामगिरी करून नावलौकिक मिळविलेल्या महाराष्ट्र नागरी सहकारी बँकेची २७ वी वार्षीक सर्वसाधारण सभा २४ सप्टेंबर २०२३ रोजी रविवारी सकाळी ११ वा.जेएसपीएम संस्थेअंतर्गत येणार्या स्वामी विवेकानंद पॉलिटेक्निक सभागृह एमआयडीसी, लातूर येथे होणार आहे.
महाराष्ट्र नागरी सहकारी बँकेची गेल्या सव्वीस वर्षापासून यशस्वी वाटचाल सुरू आहे. हे बँकेच्या कार्यावरून समोर आलेले आहे. बँकेच्या यशस्वी वाटचालीबद्दल महाराष्ट्र नागरी सहकारी बँकेला राष्ट्रीयस्तरावरील अनेक पारितोषिके मिळालेली आहे. या बँकेची २७ वी वार्षीक सर्वसाधारण सभा २४ सप्टेबर २०२३ रोजी होणार आहे.या वार्षीक सर्वसाधारण सभेच्या अध्यक्षस्थानी एमएनएस बँकेचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर हे उपस्थित राहणार आहेत. तसेच बँकेचे उपाध्यक्ष एस.आर.मोरे यांच्यासह सर्व संचालक मंडळाचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे २४ सप्टेबर रोजी होणार्या या एमएनएस बँकेच्या वार्षीक सर्वसाधारण सभेला सर्व सभासदांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन महाराष्ट्र नागरी सहकारी बँकेचे कार्यकारी संचालक बाळासाहेब मोहिते यांनी

# तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत रेणुकादेवी आश्रमशाळेचे वर्चस्व

लातूर, दि.२१ – तालुक्यातील महापूरजवळील इंदिरा गांधी प्राथमिक विद्यालय, रेणुकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेच्या मैदानावर सोमवार, दि. १८ सप्टेंबर रोजी तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धा पार पडल्या. यात रेणुकादेवी आश्रमशाळेच्या खेळाडूंनी वर्चस्व कायम राखले.



स्पर्धेसाठी तालुक्यातून १६ विविध शाळांचे ४९ संघ सहभागी झाले होते. या स्पर्धा तीन मैदानांवर एकाच वेळी घेण्यात आल्या. स्पर्धेत १४ वर्षे मुलांच्या वयोगटात आर्वी येथील शारदा सदन अनुसुचित जाती आश्रमशाळेच्या संघाने व मुरुड येथील छत्रपती शाहू मॉडर्न इंग्लिश स्कूलचा मुलींचा संघ विजयी झाला. १७ वर्षे वयोगटात रेणुकादेवी माध्यमिक आश्रमशाळेच्या दोन्ही संघांनी बाजी मारली. १९ वर्षे वयोगटात रेणुकादेवी उच्च माध्यमिक आश्रमशाळेचा मुलांचा संघ विजेता ठरला. विशेष म्हणजे याच वयोगटात याच आश्रमशाळेचा मुलींचा संघ अजिंक्य ठरला.
या स्पर्धेसाठी माध्यमिक शाळेचे पर्यवेक्षक शिवाजी बेंबडे, शिक्षक किशन मेकले, संजय जाधव, धनंजय कच्छवे, रतिकांत चिकुर्ते, उच्च माध्यमिक आश्रमशाळेचे लतिफ शेख, प्राथमिक शाळेचे पर्यवेक्षक विवेकानंद बुजारे, सिध्दार्थ कांबळे, परशुराम राठोड यांनी परिश्रम घेतले. विनायक ढवळे यांनी सामन्यांचे धावते वर्णन केले. सामन्यांच्या यशस्वीतेसाठी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेचे शिक्षक, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी विविध समित्यांच्या माध्यमातून जबाबदारी पार पाडली. स्पर्धेच्या उत्कृष्ट आयोजनाबद्दल संस्थेचे पदाधिकारी व तालुका क्रीडा अधिकारी सुरेंद्र कराड यांनी कौतुक केले.

# वरवंटीच्या मोरया गणेश मंडळाने तृतिय पंथ्यांच्या हस्ते केली आरती गणेश मंडळाच्या अनोख्या उपक्रमाची सर्वत्र प्रशंसा



लातूर / प्रतिनिधी : समाजात अनादी काळापासून दूर्लक्षित घटक म्हणून तृतिय पंथीयांकडे पाहिले जाते. यांना सामाजात ना कोणत्या शुभकार्यात किंवा ना सण उत्सव वा आनंदोत्सवात सहभागी केले जाते. परंतू या रुढी परंपरांना व अनिष्ठ प्रथांना बाजू देत वरवंटी (गावभाग) येथील मोरया गणेश मंडळाच्या पदाधिकार्यांना तृतिय पंथ्यांना गणरायाच्या आरतीचा बहुमान देऊन त्यांना सुध्दा इतर माणसांप्रमाणे मान / सन्मानाने वागण्याचा व आनंदोत्सव साजरा करण्याचा अधिकार असल्याची समाजाला जाणिव करुन देणारा कौतुकास्पद उपक्रम राबविला आहे.
लातूर तालुक्यातील वरवंटी येथील मोरया गणेश मंडळाने मंगळवार, दि. १९ सप्टेंबर रोजी या परिसरात येणार्या तृतिय पंथ्यांच्या हस्ते गणरायाची आरती करुन एक अनोखा आदर्श समाजासमोर निर्माण केला आहे. यामध्ये तृतिय पंथ्यामध्ये प्रिती माऊली लातूरकर, साक्षीमाऊली लातूरकर, वैष्णवीताई लातूरकर व त्यांच्या अन्य सहकार्यांसमवेत जवळपास ८ ते ९ तृतिय पंथ्यांना यावेळी वरवंटीच्या मोरया गणेश मंडळातील सदस्यांनी यांना आरतीचा बहुमान देऊन एक आनोखा उपक्रम राबविला आहे.
याप्रसंगी गणेश मंडळाचे पदाधिकारी अध्यक्ष : आदित्य खोबरे, उपाध्यक्ष : ऋषिकेश शिंदे, सचिव : शिवरत्न खोबरे, सहसचिव नागेश माने यांच्यासह सदस्य पवन खोबरे, चैतन्य चिकटे, स्वरुप पाडुळे, यश खोबरे, आजिंक्य माने, यांच्यासह गावातील ज्येष्ठ मान्यवरांमध्ये गावचे तंटामुक्ती अध्यक्ष किरण विजयकुमार खोबरे, माजी सरपंच दिगंबर माने, माजी ग्रा.पं. सदस्य प्रशांत नागनाथ खोबरे, माजी उपसरपंच दिलीप चिकटे, विद्यमान ग्रा.पं. सदस्य रवि शिंदे, घटनेश्वर खोबरे, युवा नेतृत्व ऋषी खोबरे, महादू माने, कुमार चिकटे, भाऊ माने, बानाप्पा लांडगे, लक्ष्मण पाडुळे, ओम माने, राजकुमार खोबरे, रोहित माने आदींची उपस्थिती होती.
याप्रसंगी तृतिय पंथ्यांना आरतीचा बहुमान दिल्याबद्दल लातूर तालुक्यातील अनेक मान्यवरांकडून मोरया गणेश मंडळ, वरवंटी यांचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

# महिलांना ३३ टक्के आरक्षणाचा लातूर महिला भाजपच्या वतीने आनंदोत्सव साजरा.

लातूर : – देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिलांना ३३ टक्के राजकीय आरक्षण देण्याचा ऐतेहसिक निर्णय मंगळवारी मंत्रिमंडळात घेतला ज्याला बुधवारी संसदेच्या सभागृहात मंजुरी मिळाली.गेली २७ वर्षांपासून हा निर्णय रखडला होता.मात्र हा निर्णय झाल्याने लोकसभा, राज्यसभा आणि विधानसभा, विधानपरिषद मध्ये महिलांचे प्रतिनिधित्व मोठ्या प्रमाणात वाढणार आहे.या ऐतिहासिक निर्णयामुळे देशभरात विशेषतः महिलांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.या निर्णयाचा जल्लोषमय आनंदोत्सव बुधवारी शहर महिला भाजपच्या वतीने महीला मोर्चाच्या शहर जिल्हाध्यक्ष सौ. रागिणी यादव यांच्या नेतृत्वाखाली शहरातील गांधी चौक येथे जमा होत तर छत्रपती शिवाजी महाराज मंडळ आणि महात्मा बसवेश्वर मंडळ येथे साजरा करण्यात आला.फुले उधळून,पेढे भरवून हा आनंदोत्सव साजरा करण्यात आला व या ऐतिहासिक निर्णयाचे स्वागत करण्यात आले.ज्याला महिला सहकाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली.यावेळी शोभाताई कोंडेकर,रत्नमाला घोडके, प्रगती डोळसे,जयश्री ताई पाटील,निर्मला कांबळे,कल्पना कुलकर्णी,जयश्री भुतेकर,शितल कुलकर्णी,आफरीन खान,हेमा येळे,ज्योती मारकडे,लता घायाळ,रेखा टेंकाळे,संध्या उमाटे, नगरसेविका शकुंतला गाडेकर, नगरसेविका भाग्यश्री शेळके, वसुंधरा स्वामी,वर्षा भराटे तसेच छत्रपती शिवाजी महाराज मंडळाच्या अध्यक्ष शोभाताई पाटील,नगरसेविका श्वेता लोंढे, नगरसेविका वर्षा कुलकर्णी, सुमन राठोड, संगीता कुलकर्णी ,संध्या जैन, सागर गवळी,भुरकेताई,स्वामी काकू,माळी काकू,सौ.क्षीरसागर,महात्मा बसेश्वर मंडल मंडल अध्यक्ष संजय वसंत गीर,नगरसेविका भाग्यश्री शेळके, महात्मा बसवेश्वर मंडल महिला मोर्चा अध्यक्ष शितल कुलकर्णी, उपाध्यक्ष लता घायाळ, बालाजी गाडेकर सिद्धेश्वर,उकिरडे, बालाजी शेळके,संतोष जाधव, शैलेश संपत्ते, बब्रुवान पंडगे आदी उपस्थित होते.





# 'सेवा महिना' अंतर्गत २७ सप्टेंबर रोजी औसा येथे पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा

लातूर, दि. २१ (जिमाका) : जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केद्र आणि औसा येथील एन.बी.एस. पॉलिटेक्निक इंस्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने 'सेवा महिना' अंतर्गत २७ सप्टेंबर २०२३ रोजी सकाळी १० वाजता पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. औसा येथील एन.बी.एस. पॉलिटेक्निक इंस्टिट्यूटमध्ये होणाऱ्या या मेळाव्यासाठी जिल्ह्यातील व जिल्ह्याबाहेरील १० आस्थापनांनी २४७ पदे अधिसूचित केली असल्याची माहिती जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त बालाजी मरे यांनी कळविले आहे.
रोजगार मेळाव्यात पुणे येथील टॅलेंट सेतू सर्व्हिसेस प्रा.लि. आणि एचआर मॅनेजमेंट सोल्युशन प्रा. लि., मुंबई येथील नीट लि., लातूर येथील जस्ट डाईल लि, आयआयएफएल समस्ता फायनान्स, क्रेडीट ॲक्सेस ग्रामीण लि., देवराज ट्रेनिंग आणि रिक्रूटिंग, लाइफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (औसा शाखा), ऑथेंटिक गार्डस इंडिया प्रा. लि. आणि द्वारकादास शामकुमार आदी आस्थापनांनी पदे अधिसूचित केली आहेत. या नामांकीत कंपन्यांमध्ये इयत्ता दहावी, बारावी, आयटीआय, डिप्लोमा, पदवी, पदव्युत्तर पदवी तसेच इतर व्यावसायिक शैक्षणिक पात्रतेच्या मनुष्यबळाची आवश्यक आहे.
इच्छुक उमेदवारांनी २७ सप्टेंबर, २०२३ रोजी सकाळी १० वाजता औसा येथील एन.बी.एस. पॉलिटेक्निक इंस्टिट्यूट येथे आवश्यक कागदपत्रांसह मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित राहावे. मुलाखतीसाठी शैक्षणिक कागदपत्रे स्वतःचा रिझ्युम, बायोडाटा, पासपोर्ट फोटो (पाच) सोबत आणावेत. लातूर जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांनी या संधीचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, मार्गदर्शन केंद्र, लातूर या कार्यालयाच्या ०२३८२– २९९४६२ दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन श्री. मरे यांनी केले आहे.

# 'कॉक्सिट'चे कबड्डी स्पर्धेत यश

लातूर, दि.२१ –स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ व निलंगा येथील महाराष्ट्र महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १५ सप्टेंबर रोजी कबड्डी स्पर्धा पार पडल्या. यात कॉक्सिट महाविद्यालयाच्या कबड्डी संघाने घवघवीत यश संपादन केले.यात कॉक्सिट महाविद्यालयाच्या श्रीनिका पाटील, साक्षी पाटील, सृष्टी बडुरे, सानिका काकडे, श्रध्दा सिध्देश्वर, प्राजक्ता नारायणपूरे, स्नेहल चालक, नंदिनी खरोसे, सलोनी शिरपूर, संस्कृती जोगदंड, वैष्णवी लोभे, अमृता जाधव या मुलींच्या संघाने द्वितीय क्रमांक पटकावला. या यशाबद्दल रॉयल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. एम. आर. पाटील, उपाध्यक्ष एल. एम. पाटील, प्राचार्य डॉ. एन. एस. झुल्पे, उपप्राचार्य डॉ. व्ही. व्ही. भोसले, क्रीडा संचालक प्रा. बी. बी. देवडे, दयानंद सरोले, अन्य प्राध्यापक व कर्मचारी यांनी या खेळाडूंचे कौतुक केले.



चिपळूण संगमेश्वर विधानसभा मतदारसंघातील लोकप्रिय आमदार शेखर निकम यांच्या घरी गणराय विराजमान

# सम्यक समाज संघातर्फे लातूरातील वकील मंडळींचा सत्कार संपन्न

लातूर :– डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लंडन येथील ग्रेज इन या संस्थेतून बॅरिस्टर ही पदवी संपादन केल्यानंतर ०५ जुलै १९२३ पासून मुंबई उच्च न्यायालयात वकिलीस प्रारंभ केला. या ऐतिहासिक घटनेला शंभर वर्ष पूर्ण होत आहे. या ऐतिहासिक आणि सस्मरणीय घटनेच्या निमित्ताने तसेच आपण वकील क्षेत्रात राहुन सामाजिक बांधिलकीतून उपेक्षित माणसांना न्याय देण्याचे काम करीत आहात याची दखल घेऊन सम्यक समाज संघाच्यावतीने प्राथमिक स्वरूपात ॲड. लहू सुरवसे, ॲड. विजयकुमार चिखलीकर, ॲड. महेंद्रकुमार इंगळे, ॲड. सुरेखा शृंगारे, ॲड. अक्षय उबाळे, ॲड. राजकुमार कांबळे यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला सम्यक समाज संघाचे अध्यक्ष ॲड. मंचकराव डोणे, मार्गदर्शक प्राचार्य डॉ. सुरेश वाघमारे, प्राचार्य डॉ. संजय गवई, कलापंढरी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष बी. पी. सूर्यवंशी, कॅप्टन डॉ. बाळासाहेब गोडबोले, प्राचार्य डॉ. वेदप्रकाश मलवाडे, बसवंतप्पा उबाळे, जेष्ठ रंगकर्मी बाळकृष्ण धायगुडे आणि डॉ. कीर्ते मॅडम आदी मान्यवरांची उपस्थिती होती.



यावेळी सत्कार मूर्ती ॲड. लहू सुरवसे, ॲड. महेंद्रकुमार इंगळे, ॲड. राजकुमार कांबळे यांनी मनोगते व्यक्त केली. तसेच बसवंतप्पा उबाळे, प्राचार्य डॉ. सुरेश वाघमारे यांनीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या न्यायालयीन कार्याबद्दल माहिती दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कॅप्टन डॉ. बाळासाहेब गोडबोले यांनी केले, प्रास्ताविक प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी केले तर अध्यक्षीय समारोप ॲड. मंचकराव डोणे यांनी केला तर आभार बी. पी. सूर्यवंशी यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संजय सुडे, ॲड. गौरव सुरवसे आणि अभिनव सुरवसे यांनी परिश्रम घेतले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE